म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा
दा. क्र. २०३९

# स्वाध्याय माला

६७

अ.वि.गृह प्रकाशन, पुणे


मध्यम विभाग

# गङ्गा

( पौराणिक व भौगोलिक )

ले०—प्रा. म. वि. फाटक,
एम्.ए., बी.टी.

IRBK-0102039
IRBK-0102039



अ.वि. गृह प्रकाशन
पुणें.

वा. क्र. २०३९

स्वाध्यायमाला : पुष्प ६७ वें

मध्यम विभाग

# गङ्गा

## (पौराणिक व भौगोलिक)

अनुक्रम 25556
विभाग
क्रमांक
नों. दि. 9/9/50

लेखक

प्रा. म. वि. फाटक, एम्. ए., बी. टी.

कर्नाटक कॉलेज, धारवाड.

सं. ठाणे,
क्र 2039 नों.
दि. वा. वा.

IRBK-0102039

संपादक-मंडळ

१ डॉ. ग. श्री. खैर, एम्. ए. पीएच्., डी.
२ श्री. दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
३ श्री. द. रा. कानेगांवकर, एम्. ए., बी. टी., चिटणीस
४ प्रा. रा. वि. ओतुरकर. एम्. ए.
५ श्री. शं. दा. चितळे, एम्. ए., बी. टी., राष्ट्रभाषा विशारद.
६ प्रि. शं. ब. सुखटणकर, बी. ए., बी. टी. डिप्. एड् (एडिंबरो)

१८६६ ] [ १९४४

# स्वाध्यायमाला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

[illegible]तारखेपर्यंत पुस्तक परत [illegible]

[illegible]री पक्षी
मधला पांडव
मर्दानी झांशीवाली
प्राण्यांच्या मौजा
सोन्याचा मुकुट
भूदेवीची भाऊबीज
आख्यायिका
सिंहांचा देश
म्हातारा नवरदेव
तोतयाचे खूळ
सुरजमल जाट
नाग लोक
पुष्पोद्भवाची कथा
रामानुजन्
देवयानी
करकंडू
मानसिंह
अथेल्लो

## मध्यमविभाग

राजा हर्ष
रघुराजा
विजेचा दिवा
ज्वालामुखी
राजा दिलीप
ॲमेझॉन
महात्मा चक्रधर
सुलभ बॅंकिंग
वॉल्ट डिस्ने
ध्रुवाचे अवतार
वीर सावरकर
हिमालयावर स्वारी
शंभूची करामत
दिनरजनी
तिबेट–दर्शन

## प्रौढ विभाग

आजचा जपान
आजचा रशिया
डॉ. राधाकृष्णन्
सत्यं शिवं सुंदरम्
इटलीचें स्वातंत्र्य युद्ध
विनोद भाग १ ला
विनोद भाग २ रा
पाणसालीचे चमत्कार
दत्ताजी शिंदे
आजचा अमेरिका
जोतीराव फुले
सागराच्या तळाशीं
कोळसा संपला–पुढें ?
जवाहरलाल
प्राथमिक संख्याज्ञान
लाल राज्य

एकूण ५२ पुष्पें

## ऑगस्ट १९४५ मध्यें प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची सूचि

अनुक्रम ...
विभाग ...
क्रमांक २०७५
नों. दि. ...

### संच तिसरा

#### प्रथम विभाग

पुष्प नांव लेखक

४४ वें. थोरले माधवराव—प्रा. द. वा. पोतदार, बी.ए.
६९ वें. रिप् व्हॅन् विंकल्—प्रा. भा. म. गोरे, एम.ए.
४० वें. राणी दुर्गावती—सौ स्नेहलता दसनूरकर, जी. ए.
१० वें गुलामगिरी—श्री. द. रा. कानेगांवकर, एम.ए., बी.टी.
४३ वें. आहिल्याबाई—श्री. मो. रा. जोशी, धुळें

#### मध्यम विभाग

५४ वें. कागद—श्री. बा. शि. नाईक
६२ वें. अंगुलिमाल—प्रा द. गं. कोपरकर, एम.ए.
६४ वें. इजिप्त—रामतनय
६५ वें. चंद्र—श्री. य. ब. पटवर्धन, एम.ए.
६६ वें. चांदीची पेटी—सौ. प्रभावती जोशी, बी.ए., एस.टी.सी
६७ वें. गंगा—प्रा. म. वि. फाटक, एम.ए., बी.टी.
६८ वें. कादम्बरी—श्री. गो. प्र. सोहोनी, बी.ए.एलएल.बी., बी.टी.
२४ वें. मधलीलामृत—श्री. दि. दा. गांगल, एम.एस्सी.
७० वें. तात्या टोपे—श्री. का. न. केळकर, अॅडव्होकेट

#### प्रौढ विभाग

७१ वें. वर्तमानपत्री संस्था—श्री. गो. प्र. भावे, बी.ए.
७२ वें. मातीचें सोनें—श्री. मु. शं. मुळे, एम.एससी.
७३ वें. पाणबुडी—श्री. दे. शं. लुकतुके, एम.एससी., बी.टी.
६३ वें. नानादेश नानादेव—श्री. य. मो. नानल, बी.ए., बी.टी.
४८ वें. शस्त्रास्त्रांची उत्क्रांति—श्री. लक्ष्मीतनय
५७ वें. काचेची कुळकथा—श्री. मु. शं. देशपांडे.

---

या पानावरील पुष्पांना घातलेले क्रमांक स्वाध्यायमालेच्या क्रमांकानुसार टाकलेले आहेत.

आवृत्ति पहिली

सर्वाधिकार स्वरक्षित

# गङ्गा

## संपादकीय

गङ्गा हें नांव उच्चारल्याबरोबर एक प्रकारचें पवित्र, शीतल व शुभ्र पाण्याच्या स्रोताचें चित्र डोळ्यासमोर उभें राहतें. कित्येकांनी गंगा प्रत्यक्ष पाहिली नसेल पण हरघडी पाण्याशीं संबंध आला कीं 'गंगा भागीरथी' म्हणूनच आम्ही त्याला संबोधतो. 'गंगा' '**भागीरथी**'— कशी हीच कथा येथें सांगितली आहे. तरीपण गंगेचें महत्त्व व तिचें भौगोलिक स्थानहि दृष्टीआड करण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. प्रा. फाटक यांनी गंगेच्या वर्णनांत काव्याचा केलेला उपयोग हृद्य आहे. 'हरगंगे' म्हणून प्रत्यहीं स्नानसमयीं आठव देणाऱ्या गंगेचें वर्णन रसिकांना पटेल व रुचेल अशी आम्ही आशा करतों.

---

**स्वाध्याय मालेंतील पुस्तकांचा उपयोग :**

( १ ) हायस्कूलमधील सगळ्या वर्गांचें पूरकवाचन म्हणून.
( २ ) मराठी शाळांतील इयत्ता ५, ६ व ७ यांना.
( ३ ) ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांसाठीं.
( ४ ) प्रौढ शिक्षणवर्गाकरितां.
( ५ ) मुलांचे घरांतील खासगी ग्रंथसंग्रहाकरितां.
( ६ ) लग्न, मुंज, वाढदिवस इ० प्रसंगी भेट म्हणून देण्यासाठीं.
( ७ ) शाळेच्या अगर तत्सम उत्सवप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

**विषयांचें स्वरूप :**

★ हायस्कूलमधील अभ्यासक्रमाला पोषक असेच विषय निवडले असून ते निवडतांना, स्थलाभावीं ज्या विषयांचे सांगोपांग विवेचन पाठ्यपुस्तकांतून नाहीं त्यांचें समग्रवाचन व्हावें अशी दृष्टि ठेविली आहे.

★ परीक्षेला उपयोगी पडून शिवाय सामान्य ज्ञान मनोरंजक पद्धतीनें मिळावें हाही हेतु आहे.

★ नुसत्या कथा देऊन मनोरंजन करण्यापेक्षां वाङ्मय, शास्त्रें, छंद यांचीं सोपपत्तिक माहिती व ज्ञान व्हावें हा उद्देशही आहे.

**किंमत**—या मालेंतील प्रत्येक पुस्तकाची किंमत **चार आणे** आहे.

★ कुटुंबसभासद व संस्थासभासद यांना सवलत आहे ★

मुद्रक व प्रकाशक
**वि. गं. केतकर, लोकसंग्रह छापखाना, ६२४, सदाशिव पेठ, पुणें २.**

अनुक्रम ....
विभाग ....
क्रमांक ....
नों. दि. ....

# गङ्गा

फार जुनी गोष्ट आहे ही. हिंदुस्थान देशास त्या वेळीं आर्यावर्त देश म्हणत असत. सूर्यवंशामध्यें जन्म पावलेला सगर नांवाचा पराक्रमी राजा त्या वेळीं राज्य करीत होता. लोक सुखानें रहात होते. राज्यांत कधीं दुष्काळ पडला नाहीं किंवा लोक रोगांनीं अल्पायुषी होऊन मरण पावले नाहींत. एकदां सगर राजाच्या मनांत अश्वमेध यज्ञ करावा अशी इच्छा निर्माण झाली. या यज्ञाच्या वेळीं राजानें श्यामकर्ण घोडा मोकळा सोडावयाचा असतो; त्या घोडयाच्या पाठोपाठ त्याचें सैन्य जात असतें. जर कोणीं घोडा धरला तर हें सैन्य त्याच्याशीं लढाई करी व आपला राजा सर्वश्रेष्ठ आहे असें सिद्ध करीत असे. सर्व देशभर त्या घोडयाचा संचार झाला कीं आपोआपच तो राजा सर्व देशांत श्रेष्ठ मानला जाई.

## सगराचा अश्वमेध

सगर राजानें हा अश्वमेधाचा अश्व सोडला. त्याच्या मागून सगर राजाचे साठ हजार पराक्रमी मुलगे व प्रचंड सैन्य जात असल्यामुळें कोणींहि हा घोडा अडविला नाहीं; उलट निरनिराळ्या लहान-थोर राजांनीं सगर राजास खंडणी देऊन त्याचा मोठेपणाच मान्य केला.

अशा रीतीनें हा घोडा पूर्व दिशेकडे स्वैर संचार करीत असतांना, एकाएकीं दिसेनासा झाला. त्याच्या मागून जाणाऱ्या सगरपुत्रांनीं व सैनिकांनीं पुष्कळ धुंडाळलें पण त्या घोडयाचा कुठेंच पत्ता लागेना. अखेर त्यांना एका ठिकाणीं अशी माहिती मिळाली कीं, अश्वमेधाचा घोडा कोणी तरी गुपचुप पाताळांत नेऊन ठेवला आहे. (वास्तविक इंद्रानें हा घोडा लपविला होता.)

ही बातमी ऐकतांच सर्व सगरपुत्र पाताळांत घुसले व घोड्याचा शोध करूं लागले. शोधतां शोधतां ते कपिल मुनींच्या आश्रमाजवळ आले, आणि काय आश्चर्य! कपिल मुनी तपश्चर्या करीत बसले असून, त्यांच्या जवळच अश्वमेधाचा अश्व चरत आहे असें दृश्य त्यांना दिसलें. 'आपण इतका शोध करावा आणि या कपिल ऋषीनें घोडा पळवून आणावा असा समज झाल्यामुळें त्या सगराच्या मुलांना कपिलचा राग आला. यानेंच घोडा चोरला असावा असा संशय येऊन त्यांनीं कपिलाची उद्धटपणें चौकशी आरंभिली. कपिलमुनी तपश्चर्या करीत असल्यामुळें त्यांना वास्तविक हा प्रकार काय घडला हें माहीतच नव्हतें. तपश्चर्येंत गुंग असल्यामुळें त्यांना उत्तरहि देतां आलें नाहीं. पण त्याचा परिणाम असा झाला कीं, सगर-पुत्रांचा राग अनावर झाला व त्यांनीं त्या मुनीस शिव्या देण्यास व मार-झोड करण्यास आरंभ केला. तत्काळ कपिलांची समाधि भंग पावली त्या अविचारी सगरपुत्रांकडे रागानें पाहिलें मात्र! त्यांच्या तेजस्वी डोळ्यांतून जणुं अग्निच बाहेर पडला आणि एका क्षणांत ते साठ हजार सगरपुत्र जळून भस्म होऊन पडले!

सगर राजास आपले साठ हजार पुत्र अशा रीतीनें दग्ध झाल्याची बातमी समजली व त्यास अनिवार दुःख झालें. त्यानें आरंभ केलेला अश्व-मेध यज्ञ मध्येंच बंद पडला. या सर्व प्रसंगाचा परिणाम होऊन सगर राजा लवकरच मृत्यु पावला. सगर राजाचा अति बलाढ्य नातु 'अंशुमान' नांवाचा होता. त्यानें आपल्या चुलत्यांना मोक्ष मिळावा म्हणून प्रयत्न केला, पण तो प्रयत्न सफल झाला नाहीं. अंशुमानाचा मुलगा दिलीप जेव्हां राज्यावर बसला तेव्हां त्यानें तप करून सगरपुत्रांना सद्गति मिळवून देण्याचा प्रयत्न केला; पण हाहि प्रयत्न यशस्वी झाला नाहीं.

दिलीपानंतर त्याचा मुलगा भगीरथ गादीवर बसला. कांहीं झालें तरी आपल्या जळून भस्म झालेल्या पूर्वजांचा उद्धार केल्याशिवाय स्वस्थ रहावयाचें नाहीं असा त्यानें निश्चय केला. परंतु कपिलमुनींच्या रागामुळें दग्ध झालेले सगरपुत्र पवित्र होणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हती.

## तपस्वी भगीरथ

ज्या श्रेष्ठ मुनींनीं आपल्या पूर्वजांना शासन केलें, तेच मुनी त्यांच्या उद्धाराचा मार्ग दाखवितील असा विचार करून भगीरथ कपिल मुनींना शरण गेला व 'आपल्या पूर्वजांवर दया करून त्यांना सद्‌गति द्या' अशी त्यांना विनंति केली. कपिल मुनी मनानें फार थोर व दयाळू होते. त्यांनीं सांगितलें—"भगीरथा, जर या पूर्वजांचा उद्धार करावयाचा असेल, तर तें काम फक्त स्वर्गांत वहाणारी गंगा नदीच करूं शकेल. जर तूं तपश्चर्येनें गंगेला प्रसन्न केलेंस व तिला पृथ्वीवर वहावयास सांगून तिच्या अत्यंत पवित्र पाण्याचा स्पर्श तुझ्या जळून भस्म झालेल्या पूर्वजांस करविलास, तरच त्यांना सद्‌गति मिळेल, व त्यांचे आत्मे स्वर्गांत जातील."

भगीरथ हा फार न्यायी व सदाचरणी राजा होता. त्यानें कपिल मुनींचें भाषण ऐकतांच निश्चय केला कीं वाटेल तें होवो, गंगेला प्रसन्न करून पूर्वजांना सुखी करावयाचें. त्यानें आपल्या राज्याचा कारभार योग्य मंत्र्याच्या स्वाधीन केला. त्याला सदाचरणानें, न्यायानें, प्रेमानें प्रजेचा संभाळ करण्यास बजावलें आणि तो एकदम हिमालय पर्वतावर उग्र तपश्चर्या करण्यास निघून गेला.

## नगाधिराज हिमालय

सर्व जग ज्याच्यापुढें क्षुद्र वाटावें असा तो हिमालय म्हणजे

पर्वतराज आहे. आकाशाला जाऊन भिडणारे मोठे वृक्ष, काळ्याकभिन्न प्रचंड शिलाराशी, सर्व प्रदेश गर्जनेनें दुमदुमून टाकणारे वाघासारखे हिंस्र पशु, आजूबाजूला गोड सुवास दरवळून सोडणारे कस्तुरी मृग, हत्तीच्या सोंडेप्रमाणें प्रचंड पर्जन्यझोत सोडणारे ढग, त्या ढगांतून दश-दिशा उजळीत बाहेर पडणाऱ्या विजा, त्या विजेच्या वेगाशीं स्पर्धा कर-णारा वेगवान् वादळी वारा, आणि त्या सर्वांनाही भव्यतेनें व तेजानें लाजविणारीं बर्फाच्छादित शुभ्र व उत्तुंग शिखरें—हिमालयापुढें कोण शरण जाणार नाहीं?—त्या हिमालयाच्या एका उंच शिखरावर भगीरथ जाऊन पोहोंचला. स्वर्गीत वहाणारी, सर्व देवांनीं पवित्र मानलेली, मंदाकिनी ऊर्फ स्वर्गंगा पृथ्वीवर वहावयास आणणें फार कठिण काम होतें. परंतु भगीरथ प्रयत्नवादी होता. त्यानें एक हजार वर्षें गंगेची तपश्चर्या केली. भूक व तहान याची त्याला आठवणच झाली नाहीं. हिमालयावर कोसळणारा पाऊस, मधून मधून होणारा बर्फाचा वर्षाव, अंगाला भेदून टाकणारा वादळी वारा, शरीरांतील रक्त गोठून टाकणारी कडक थंडी—पण भगीरथाला त्याची पर्वाच वाटत नव्हती. गंगेच्या भेटीखेरीज त्याला कांहीं सुचत नव्हतें. अशा तऱ्हेनें एक हजार वर्षें लोटलीं व एका प्रातःकालीं त्याच्यासमोर प्रत्यक्ष स्वर्गंगा मूर्तिमंत येऊन उभी राहिली. त्याच्या अखंड तपानें व त्याच्या शुद्ध भक्तीनें गंगादेवी प्रसन्न झाली. त्याचें उग्र तप फळास आलें. गंगा त्यास म्हणाली—"भगीरथा, उघड डोळे. तुझ्या प्रखर तपश्चर्येनें व दृढनिश्चयानें मी संतुष्ट झालें आहे. तुझी काय इच्छा आहे ती सांग." गंगेचे शब्द त्याच्या कानाला अमृताप्रमाणें मधुर लागले. स्वर्गीतील त्या मूर्तिमंत पावित्र्याला पाहून, त्यानें साष्टांग नमस्कार घातला आणि तो म्हणाला—"देवी, गंगामाते, माझ्या पूर्वजांची-सगर राजाच्या

अखेरीस भगवान् शंकर प्रसन्न होऊन त्याच्यापुढें उभे राहिले. भगीरथानें शंकरांस वंदन करून म्हटलें—"देवाधिदेवा, माझ्या पूर्वजांचा उद्धार करण्यासाठीं मी तपश्चर्या करून पवित्र गंगानदीस प्रसन्न करून घेतलें आहे. परंतु तिचा वेग आडवून धरण्यास आपल्याखेरीज कोण समर्थ आहे? आपण माझ्यावर कृपा करा आणि गंगेचा प्रवाह पृथ्वीवर आणण्यास मला मदत करा."

भगीरथाच्या नम्र भाषणानें श्रीशंकर संतुष्ट झाले, आणि म्हणाले, "भगीरथा, तुझ्या प्रयत्नांची शिकस्त आहे. पितरांच्या उद्धारासाठीं गंगेला प्रसन्न करून घेतलेंस याबद्दल तुझें कौतुक करावें तितकें थोडेंच! संकटांना जुमानलें नाहींस, थंडी-वारा-पाऊस-बर्फ यांच्या वर्षावापासून परावृत्त झाला नाहींस, दोन हजार वर्षें अन्नपाण्यावांचून, कंटाळून न जातां, तपश्चर्या केलीस; सतत प्रयत्न केलास यामुळें तुझें नांव सर्व जगांत प्रसिद्ध होईल. तुझ्यासारखे, चिकाटीनें जे प्रयत्न केले जातील, त्यांना 'भगीरथ प्रयत्न' असें अनुरूप नांव मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. तुझ्यासारखे ध्येयप्राप्तीसाठीं सतत प्रयत्न करणारे लोक या पृथ्वीवर असले, तर ही पृथ्वी एका क्षणांत स्वर्गमय होऊन जाईल. परंतु या जगांत मला आळशी लोकांचाच अधिक भरणा झालेला वाटतो. आळसामुळें लोक दुःखी होतात, दरिद्री होतात. दारिद्र्यामुळें भांडणें सुरू होतात, द्वेष बळावतो आणि अखेर तो समाज अधोगतीस जातो. मला यत्नदेवाची पूजा करणारे लोक आवडतात. भगीरथा, तुझ्या प्रार्थनेपेक्षां प्रयत्नानेंच मला खरा आनंद वाटत आहे. हा मी तुझ्या इच्छेप्रमाणें गंगा उतरवून घेण्यास तयार आहे."

## अलकनन्दा

असें भाषण करून भगवान् शंकर हिमालयाच्या शिखरावर पवित्रा

घेऊन मोठया आवेशानें उभे राहिले. भगीरथानें पुनश्च गंगेची प्रार्थना करून तिला पृथ्वीवर येण्यास विनविलें; आणि एका क्षणांत गंगेचा भरदार व वेगवान प्रवाह स्वर्गांतून खालीं वाहूं लागला. गंगेचा प्रवाह पडत असतांना, जिकडे तिकडे एकच "धो धो" आवाज घुमूं लागला, पर्वतशिखरें हादरूं लागली, पृथ्वीला कंप सुटला, परंतु भगवान् शंकरांनीं तो गंगेचा ओघ सहज लीलेनें आपल्या मस्तकावर धरून जटेंत अडकवून टाकला. गंगेला स्वत:च्या वेगाचा व सामर्थ्याचा थोडासा गर्व झाला होता पण



शंकरांनीं गंगेला जटेंत अडकवून तिचा गर्व हरण केला, आणि नंतर हलकेंच जटेंतील एक केंस तोडून गंगेच्या प्रवाहास वाट दिली. या प्रवाहासच 'अलकनंदा' असें नांव मिळालें.

गंगेस शंकरांनीं जटेतून सोडल्यावर ती भगीरथाच्या मागून निघाली. गंगा ही स्वर्गांत रहाणारी, देवांची नदी—पण तिला भगीरथानें पृथ्वीवर आणली म्हणून तिला "भागीरथी" असेंहि एक नांव मिळालें.

स्वर्गांतून शंकराच्या मस्तकावर कोसळणाऱ्या गंगेचें वर्णन करतांना नरहरि हा कवि म्हणतो.

सुरलोकाहुनि गंगा खालीं, भूमीवरि येण्यास निघाली।
शर्वजटीं ती उडीच घाली, देवमंडळी पाहूं आली।
फिरति विमानें दाटी झाली, मुनि-गण-संतति सर्व मिळाली।
जयोऽस्तु म्हणुनी स्तवनें करिती, सुरांगना ओवाळति आरती।
किन्नर टाकिति पुष्पें वरती, हा हा हू हू तुंबरु गाती।
सर्व अप्सरा प्रेमें नाचति ।।........

हिमालयाच्या शिखरावर ज्या ठिकाणीं शंकरांनीं गंगेस जटेंतून सोडलें त्या ठिकाणास आज आपण गंगोत्री म्हणतो. ह्या ठिकाणाहून निघणाऱ्या प्रवाहाविषयीं चिंतामणि पेटकर यांनीं म्हटलें आहे—"

"गंगोत्री वरुनि अशी वहात धन्या
हे आल्यावरि पुढती हिमाद्रिकन्या
बाजूला खडक असून उंच भारी
वाहे त्यांमधुनि तिचें विशुद्ध वारी

हिमालयांतून गंगेच्या ओघाला घेऊन भगीरथ चालला असतांना त्याच्या मनांत गंगेच्या पवित्रपणाविषयींच सारखे विचार येत होते. "जर ह्या पवित्र गंगेच्या पाण्याचा उपयोग आपल्याप्रमाणेंच आपल्या देशांतील पुष्कळ लोकांना घेतां आला तर सर्व लोक सहजगत्या सुखी होतील—"

अनुक्रम विभाग क्रमांक नों. दि.

मनांत हा विचार आला मात्र, लगेच त्यानें ठरविलें कीं गंगेच्या प्रवाहाची लांबी आपणास जितकी वाढवितां येईल तितकी वाढवावयाची. खूप वळणें घेत घेत गंगेचा प्रवाह दूरवर न्यावयाचा. विचारांच्या ओघांत हिमालयाच्या उतरणीवरून त्याचीं पावलें भराभर चालूं लागलीं. त्याच्या पाठोपाठ गंगेचा प्रवाहहि खळखळ आवाज करीत कड्यावरून उड्या घेत घेत, वेगानें वाहूं लागला.

गंगेला घेऊन भगीरथ हिमालयाच्या उतरणीखालीं पायथ्याशीं असलेल्या हृषीकेश व हरिद्वार या ठिकाणीं पोहोंचला. त्यानें क्षणभर मागें वळून पाहिलें. दूरवर हिमालयाचीं बर्फाच्छादित पांढरीं शुभ्र शिखरें पसरलीं आहेत; आजूबाजूला निरनिराळ्या प्रकारचे देवदार, साग, बेल, चीड यांचे उंचच उंच वृक्ष उभे आहेत; आणि त्यांच्या मधूनच पांढऱ्या शुभ्र रंगाचा गंगेचा प्रवाह खळखळाट करीत वेगानें धांवत आहे. हृषीकेश व हरिद्वार येथें रहाणाऱ्या ऋषी-मुनींचे आश्रम मधून मधून दिसत आहेत. त्या दृश्यामुळें त्याला अत्यंत प्रसन्नता वाटली. इतक्यांत त्या आश्रमांतून विजेच्या तेजानें तेजस्वी दिसणारे ऋषी व मुनीच गंगेच्या दर्शनासाठीं येत असल्याचें त्यास आढळून आलें. त्या परम पवित्र गंगेच्या कांठीं ते तेजस्वी येतांच भगीरथानें मोठ्या आदरानें त्यांना वंदन केलें. त्या मुनींनीं गंगेला वंदन केलें व मोठ्या चिकाटीनें स्वर्गातून गंगा पृथ्वीवर आणल्याबद्दल भगीरथास धन्यवाद दिले.

## गंगेचें खोरें

हिमालयाचा प्रांत सोडून भगीरथ दक्षिण दिशेस पसरलेल्या सपाट प्रदेशांतून जाऊं लागला. या प्रांतासच हल्लीं संयुक्तप्रांत असें म्हटलें

जातें. पूर्वी हा प्रांत फारसा सुपीक नव्हता; परंतु भगीरथानें गंगा या प्रदेशांतून नेल्यापासून हा अत्यंत सुपीक बनला. गंगेच्या प्रवाहाला अनेक कालवे काढले गेले व त्यावर मोठ्या प्रमाणावर जमीन भिजवून गहूं, तांदूळ ऊंस, कापूस व मका यांचें प्रचंड उत्पन्न काढलें जातें. शेती व कारखाने यांच्यामुळें गजबजलेला व लोक श्रीमान व सुखी झालेले पाहून एक कवि म्हणतो—

" कुठें, देवि, दोहींकडे त्वत्तटांशीं ।
फुलांचीं वनें राहती रम्य खाशीं ॥
कुठें काशभूयिष्ट भूमी रहाती ।
जिथें गोधनें चारिती गोपजाती ॥
कुठें शोभती रम्य खेडीं, जयातें ।
जुने वृक्ष देती दृढालिंगनातें ॥
कुठें पत्तनें शोभतीं रम्य, ज्यांच्या ।
नभा वेधती चंद्रशाला गृहांच्या ॥ "

संयुक्त प्रांतांतून गंगेच्या कांठानें जर आज कोणी प्रवास करूं लागेल तर त्यास प्रथम इतिहासप्रसिद्ध कनोज शहर लागेल. तेथील अत्तराच्या घमघमाटानें त्याचें मन प्रसन्न होईल तोंच त्यास पृथ्वीराज-संयोगिता विवाहाचा इतिहास आठवेल आणि जयचंद राठोडाचीं दुष्कृत्यें आठवून दुःखाचा उमाळा येईल. कनोज सोडून जावेसें वाटेल आणि तो पुढें कानपूर या प्रसिद्ध शहरीं येईल. १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धांत शिपायांनीं केलेली इंग्रजांची कत्तल व त्याचा सूड म्हणून इंग्रजांनीं घेतलेला निरपराधी स्त्री-पुरुषांचा बळी हा इतिहासांतील दुःखद प्रसंग आठवेल. कानपूरला असलेले कातडें कमावून निरनिराळया वस्तू तयार करण्याचे उद्योगधंदे, साखर करण्याचे कारखाने, सुती व लोंकरीचें कापड विणणाऱ्या गिरण्या,

लोखंडाचे कारखाने, व रासायनिक औषधें बनविणाऱ्या भव्य प्रयोगशाला पाहून कानपूरला औद्योगिक क्षेत्रांत मिळालेल्या महत्त्वाबद्दल अभिमान वाटेल. कानपूरजवळच असलेल्या बिठूर अथवा ब्रह्मावर्त गांवीं दुसरे बाजीराव पेशवे यांचा रहाता वाडा बघण्यासहि तो विसरणार नाहीं. कानपूरपासून पुढें येतांना गंगा व यमुना यांच्या प्रवाहांमधून दिसणारा सुपीक दुआब पाहून आपल्या राष्ट्रगीतांत देशास "सुजलां सुफलां सस्य श्यामलां" असें कां म्हटलें आहे याचा त्याला उलगडा होईल. सृष्टीच्या त्या धान्य-वैभवामुळें आनंदित होऊन तो पुढें येतों तोंच प्रयागजवळ त्याला त्रिवेणी-संगमाचा अद्वितीय सुंदर देखावा दिसेल. पूर्वदिशेनें वाहूं लागणारी गंगा, तिला प्रेमानें भेटावयास आलेली यमुना व त्या दोन नद्यांच्या भेटींतच गुप्तपणें प्रकट होणारी सरस्वती नदी यांचा तो संगम कोणाला आनंद-कारक व पवित्र वाटणार नाहीं ? गंगेचें शुभ्र जल व यमुनेचें काळेभोर जल यांचा तो संगम पाहून नरहरि म्हणतो—

**"सित-कृष्ण तोय भासे अद्यापि पावली जिथें संगा।**
**पूर्वाभिमुखी होऊनि यमुनेसह चालली पुढें गंगा"॥**
**"भागीरथीचें अतिशुभ्र वारी। काळी दिसे सूर्य-सुताहि भारी।**
**दोघींमधें जें जळ लाल आहे। सरस्वती ती प्रकटोनी वाहे॥"**

## गंगा–यमुना !

गंगेला यमुना मिळाल्यामुळें गंगेचा प्रवाह फारच भव्य दिसावयास लागतो. प्रयाग अत्यंत पवित्र क्षेत्र मानलें जातें. प्रयागनंतर पूर्वदिशेनें गंगा वाहत जाते. प्रयागनंतरचें महत्त्वाचें शहर म्हणजे काशी होय. काशी हें हिंदुधर्माचें अग्रगण्य क्षेत्र होय. गंगेचें पात्र रुंद झालें व वेगहि कमी झाल्या-मुळें काशीला लहान मोठे मचवे गंगेतून प्रवास करतांना आढळतात. काशी

येथील विश्वेश्वर, काळभैरव यांचीं देवळें; मनकर्णिकेचा घाट हे यात्रेकरूंनीं व भाविकांनीं नेहमींच गजबजलेले आहेत. हिंदुधर्माप्रमाणें हिंदुसंस्कृतीचें व विद्येचें केंद्र काशी पुरातन कालापासून मानली जातें. आजहि तेथें हिंदु विश्वविद्यालय ज्ञानदानाचें कार्य भव्य प्रमाणांत करीत आहे. गंगेच्या कांठीं धनिक लोकांनीं भव्य घाट बांधले आहेत. या घाटावरून शेंकडों लोक "हर हर गंगे", "गंगामाता कीं जय" अशा जयजयकारांत गंगेच्या पाण्यांत उडया टाकीत असतात. अशाच एका घाटावर उभा राहून जगन्नाथ पंडितानें गंगालहरी हें सुंदर, संस्कृत काव्य लिहिलें. जगन्नाथपंडितानें एका मुसलमान स्त्रीबरोबर विवाह केला होता. तेव्हां लोकांनीं त्यास अपवित्र ठरविलें. गंगेच्या कांठावर उभे राहून जगन्नाथपंडितानें गंगेच्या स्तुतीचा एक एक श्लोक म्हणावयास सुरुवात केली आणि काय आश्चर्य! गंगेचें पाणी दर श्लोकानुसार एक एक पायरी चढून आलें. ८४ पायऱ्या चढून गंगेच्या पवित्र पाण्यानें जगन्नाथाला पुन्हां शुद्ध केलें अशी आख्यायिका येथेंच सांगितली जाते.

काशी सोडून आपण पुढें गेलो कीं, संयुक्त प्रांताची सीमा संपते व आपण बिहार प्रांतांत शिरतों. याच बिहारला पूर्वीं मगध देश म्हणत असत. या प्रांतांतून गंगा वहात असतांना, हिमालयावरून येणाऱ्या "गोमती, घोग्रा व गंडकी" या वेगवान् नद्या तिला मिळतात. हिमालयामध्यें या नद्या निघत असल्यामुळें गंगेला पावसाळयांत पावसामुळें भरपूर पूर येतो. या दुहेरी पुरामुळें गंगेचें पात्र भव्य व पाण्यानें सदा भरलेलें दिसतें. या बिहार प्रांतांत गंगेस दक्षिणेकडून वहात येणारा शोण नद आणि अयोध्येवरून वहात येणारी शरयू नदी पाटण्याजवळ मिळून गंगेचें पात्र एक मैलांपेक्षां अधिक रुंद दिसतें. मोठमोठया बोटी व मचवे माल व प्रवासी घेऊन जात-येत

असतात. गंगेला कालवे काढले आहेत, धरणें बांधलीं आहेत आणि त्यांच्या साह्यावर तांदूळ, ऊस, तंबाखू, गहूं, नीळ, मका, कडधान्यें यांचें पीक सर्व प्रांतभर काढलें जातें. पाटणा ऊर्फ पाटलीपुत्र सोडल्यावर गंगेचा प्रवाह बंगाल प्रांतांत शिरतो. बंगालमध्येंसुद्धां हीं पिकें काढलीं जातात.या ठिकाणीं गंगेच्या प्रवाहाची दिशा बदलते आणि ती कलकत्त्याच्या पुढें दक्षिणेकडे पसरलेल्या बंगालच्या उपसागराला भेटण्यासाठीं सहस्र प्रवाहांनीं हात पसरून धांव घेते.

## गंगेचें आचमन !

वाचकहो, पुन्हां आपणास भगीरथाच्या गोष्टीकडे वळलें पाहिजे. गंगेच्या ओघाला बरोबर घेऊन निरनिराळे प्रांत सुपीक करीत भगीरथ अंग देशामध्यें आला. यालाच हल्लीं आपण बंगाल प्रांत म्हणतों. या ठिकाणीं भगीरथापुढें निराळेंच संकट निर्माण झालें. येथें जन्हु नांवाचा एक पराक्रमी राजा यज्ञ करीत होता. यज्ञासाठीं सर्व सामुग्री तयार करून ठेवली होती, इतक्यांत गंगेला स्वत:च्या जलवैभवाचा पुन्हां गर्व झाला आणि तिनें सर्व सामुग्री प्रवाहाबरोबर पळविली. जन्हु राजाचा यज्ञ बंद पडला; मंत्र सांगणारे ब्राह्मण दूर पळून गेले. त्यामुळें जन्हु राजास गंगेचा राग आला व त्यानें तप:सामर्थ्यावर गंगेचें सर्व पाणी एका आचमनांत पिऊन टाकलें. गंगेचा गर्व हरण झाला हें खरें पण भगीरथाचें कार्य पुन्हां अडून बसलें. भगीरथ निराश झाला नाहीं. तो प्रयत्नवादी होता. त्यानें जन्हु राजाची प्रार्थना केली व स्वपितरांच्या मुक्तीसाठीं गंगानदीस सोडून देण्याची विनंति केली. भगीरथाचें नम्र भाषण व त्यानें केलेलें प्रयत्न ऐकून जन्हु राजानें प्राशन केलेली गंगा नदी कानांतून



बाहेर टाकली. जन्हु राजापासून गंगा नदी पुन्हां बाहेर पडल्यामुळें लोक गंगेला जान्हवी या नांवानें हांक मारूं लागले. जन्हुराजापासून गंगा-नदी मिळवून भगीरथ अखेरीस ज्या ठिकाणीं सगर राजाचे साठ हजार पुत्र जळून भस्म झाले होते त्या ठिकाणीं पोहोंचला. गंगेच्या परम पवित्र पाण्याचा स्पर्श होतांच ते सगरपुत्र एकदम पवित्र झाले. पातकापासून

त्यांची सुटका झाली व त्यांचे आत्मे स्वर्गलोकांत रहावयास गेले. भगीरथानें आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. सर्व संकटांना तोंड दिलें आणि आपण अंगिकारलेलें महान् कार्य तडीस नेलें ! गंगेनें त्याच्यासाठीं १६०० मैल येऊन ते सगरपुत्र शुद्ध केले ! ती म्हणाली—"राजा भगीरथा तुझी धन्य आहे. प्रयत्नाची शर्थ करून तूं सर्व जगाला आदर्श ठरला आहेस. तुझी इच्छा तृप्त झाली ना ? ज्या ह्या वनांत तुझ्या पूर्वजांचा उद्धार झाला, तेथें 'सुंदरी' नांवाचीं झाडें निर्माण होतील. ह्या प्रान्तास सुंदरबन म्हटलें जाईल. हीं झाडें जगाच्या अंतापर्यंत तुझ्या प्रयत्नाचे पोवाडे मानवजातीला गावून दाखवितील. राजा भगीरथा, आतां तूं प्रसन्न अंत:करणानें घरीं जा; सर्व प्रजा तुझ्या भेटीसाठीं अधीर झाली आहे. त्या प्रजेचें कल्याण कर. माझ्या कांठावर ठिकठिकाणीं घाट बांधून ठेव. आतां मी येथेंच रहाणार. तूं ३६००० वर्षें राज्य करशील असा माझा तुला आशीर्वाद आहे. तुझ्या यज्ञांत प्रत्यक्ष देव भाग घेतील; आणि माझा प्रवाह जोंपर्यंत वहात आहे तोंपर्यंत भाविक लोक माझ्याबरोबर तुझाही 'गंगा भागीरथी' असा जयघोष करून, तुझी आठवण नित्य ठेवतील—जा !"

भगीरथ संतुष्ट होऊन परतला ! गंगेनें त्या सुंदरबनापलीकडे तिच्या भेटीसाठीं उत्सुक झालेल्या समुद्राची, त्या भव्य सागरदेवाची हांक ऐकली. तिचा उत्साह वृद्धिंगत झाला आणि एकदम सहस्र हातांनीं तिनें सागरदेवाला मिठी मारली !!

## स्वाध्याय

(१) भगीरथानें पृथ्वीवर गंगा कां आणली ?

(२) भगिरथाला आपलें ध्येय पूर्ण करण्यासाठीं कोणकोणत्या संकटांना तोंड द्यावें लागलें ?

(३) "भगीरथ प्रयत्न" ह्या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून, एकाद्या वाक्यांत त्याचा उपयोग करून दाखवा.

(४) गंगेला एकंदर किती नांवें आहेत ? तीं नांवें कां मिळालीं ?

(५) गंगा पृथ्वीवर आणल्यामुळ हिंदुस्थानचा प्रत्यक्ष काय फायदा झालेला आज दिसतो ?

म. प्र. सं. ठाणे,
वा. क्र. २०३८ नों. दि ……
वि. भा. वा. क्र. ……

IRBK-0102039